# बुरशीयुक्त संसर्गदोष - Q Series

१. आमच्या खेड्यापाड्यात बुरशी असलेला संसर्गदोष फार आढळतो.

२. ज्या लोकांना ह्या संसर्गदोषाची लागन झाली आहे त्याच्यापासून किंवा आपल्या पाळीव कुत्र्यापासून किंवा मातीमुळे आपल्याला हा संसर्गदोष होऊ शकतो.

३. मातीत किंवा पाळीव कुत्र्यात नेमक काय आहे की ज्यामुळे आपल्याला हा संसर्गदोष होतो ? त्या घटकाच नाव टबुरशी आहे. सुक्ष्मदर्शक यंत्रात ही बुरशी अश्या प्रकारे दिसते.

४. पावसाळ्यात दोन अंगठ्याच्या मध्यभागी ओलावा राहतो त्या भागाला खाज सुटते ह्याचे मुख्य कारण असे की अंगठ्याला लागलेला मातीत बुरशी असते.

५. हा संसर्गदोष होऊ नये असे आपणास वाटत असल्यास आपण जेव्हा आपल्या शेतातून घरी परत येतो तेव्हा पाय स्वच्छ धुवावे. व पुसुन कोरडे करावे.

६. जर ओलावा राहिल्याने पायाला खाज सुटली व जर तुम्हांला चिखल्यारोग झाला असेल तर पाय स्वच्छ धुवून पुसुन कोरडे करावे. नंतर माक्याच्या पानांचा रस पायाला, अंगठ्यामध्ये लावावा.

७. दुसरा उपाय म्हणजे मेंदींची चटनी करून लावणे.

८. बुरशीचा संसर्गदोष आपल्या पायांना....

९. ....व हातांना होऊ शकतो.[§]

१०. कच्चा पपईच्या चिक काढून लावल्यास अति उत्तम.

११. मातीत काम केल्यानंतर जर हात स्वच्छ धुतले नाहीत व नखात साचलेली माती काढून टाकण्यासाठी योग्य ती काळजी घेतली नाही तर नखा मध्ये संसर्गदोष होतो व हा बरा होण्यास विलंब लागतो.

१२. आपल्या नख्यामध्ये जो संसर्गदोष निर्माण होतो, तो दुसऱ्या एका प्रकारच्या बुरशी पासून होतो. व तो असा दिसतो. ह्यासाठी औषधपचार त्वरीत करावा.

१३. अश्या वेळी बोटापासून नख जेथे वाढते, तेथे मलम लावावा. मलम चांगला घासून लावावा. लक्षात ठेवा प्रतिबंध उपाय हा रोगावर असलेला उत्तम उपाय आहे. म्हणून स्वतः हात धुवा, आपल्या मुलांना सुध्दा जेवणा अगोदर व झोपण्या अगोदर हात पाय धुवायला लावा.

१४. बुरशीमुळे पाय फाटतात. पायाला भेगा पडतात.

१५. जर तुम्हांला हा त्रास असेल तर झोपायला जाण्या अगोदर दररोज पाय साबण व गरम पाण्याने स्वच्छ धुवावे.

१६. ..... नंतर भेगा पडलेल्या भागास खैरापासून तयार केलेला àààààààààààààà
घनवटी लावा.

घनवटी तयार करणः-
१ ग्लास झाडाची साल पूर्ण चटनी करून त्यामध्ये ४ ग्लास पाणी टाका, व ते पाणी चुलीवर दोन ग्लास होई पर्यंत आटवा. जाड झालेले द्रव्य गाळा व परत घट्ट होई पर्यत गरम करा.

१७. नायटा, गर्जकर्ण ह्यावर ताबडतोब उपाय केला पाहिजे. जर केला नाही तर नायटा पसरत जातो.

१८. नायटयास उत्तम उपाय म्हणजे सोनियो- जंगली तुळस पूर्ण झाडाचा उपयोग करून चटनी करून बनविणे व ती नायटा होणाऱ्या भागाला लावणे.

१९. नायटा तोंडावर असो खाकेत असो किंवा जांघेत असो हा आजार बुरशीमुळे होतो. फार खाज सुटते व जर त्वरीत उपाय न केल्यास अश्या प्रकारे पसरतो त्यासाठी कमीत कमी महिनाभर औषधपचाराची गरज असते.

२०. वाघनोखी पासून काढलेले तेल रोज अंघोळी नंतर लावावे.

कृति :- पिकलेले फळ एका मातीच्या मडक्यात घालावे. मडक्याच्या तळाला एक लहान छिद्र ठेवावे. मडक्याचे तोंड पुर्ण पणे बंद करावे व मडके एका धातूच्या भांड्यावर ठेऊन एका खड्ड्यात ठेवावे. मडक्याचे भवती गोवरी ठेवावे. त्या गोवरी पेटवून द्याव्या. जेव्हा आग विझेल व राख थंड झाली म्हणजे धातूच्या भांड्यात तेल जमा झालेले दिसेल.

२१. आणखीन एक उपाय म्हणजे बावची वनस्पती पासून केलेली चटनी वापरणे.

२२. काही लोकांचे व लहान मुलांचे केस गळतात ह्याचे कारण दुसऱ्या प्रकारचा बुरशी.

२३. तेल करण्याची प्रक्रिया
कृति :- पाव किलो तीळ तेलामध्ये १ किलो माक्याचा रस ओता चुलीवर ठेऊन तेल शुध्द होई पर्यत चांगले गरम करा. सदर तेल १५ दिवसा पर्यत झोपण्या अगोदर लावावे.

वरील सर्व रोगासाठी निंब तेलाचा उपयोग करता येईल.